# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 20 November 2024
## Time 18.10 to 18.20
## Language Marathi
## **आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**
## **प्रादेशिक बातम्या**
## **दिनांक – २० नोव्हेंबर २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- विधानसभेची मतदान प्रक्रिया पूर्ण-पाच वाजेपर्यंत राज्यात ५८ पूर्णांक २२ शतांश टक्के मतदान
- अंबाजोगाई तालुक्यात मतदान केंद्रांवर हल्ला;मतदान यंत्रांची तोडफोड-प्रशासनाच्या कारवाईनंतर मतदान प्रक्रिया सुरळीत-सर्व मतदान सुरक्षित असल्याचा निर्वाळा
- बीड इथं अपक्ष उमेदवाराचा हृदयाघाताने मृत्यू तर परळीत मतदान केंद्र अधिकाऱ्याला हृदयविकाराचा झटका
- मतदान गोपनीयता भंग प्रकरणी हिंगोली तसंच परभणीत दोन मतदारांविरोधात गुन्हा दाखल

आणि

- निवडणूक विभागाकडून राज्यभरात लक्षवेधक मतदान केंद्रांची उभारणी-मतदारांचा उत्स्फुर्त प्रतिसाद

****

राज्य विधानसभेच्या २८८ जागांसह नांदेड लोकसभेच्या पोटनिवडणुकीसाठीची मतदान प्रक्रिया आज किरकोळ अपवाद वगळता शांततेत पार पडली. संध्याकाळी सहा वाजता मतदानाची वेळ संपली तेव्हा, राज्यभरातून निवडणुकीच्या रिंगणात उतरलेल्या चार हजार १३६ उमेदवारांचं भवितव्य मतदान यंत्रात बंद झालं. आता येत्या शनिवारी २३ तारखेला होणाऱ्या मतमोजणीपर्यंत ही सर्व मतदान यंत्र सीलबंद अवस्थेत पूर्ण सुरक्षेत ठेवण्यात येणार आहेत.

सायंकाळी पाच वाजेपर्यंत राज्यभरात ५८ पूर्णांक २२ शतांश टक्के मतदानाची नोंद झाली. अंतिम आकडेवारीनंतर हे प्रमाण काही टक्क्यांनी वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात सायंकाळी पाच वाजेपर्यंत ६० पूर्णांक ८३ टक्के मतदान झालं. बीड जिल्ह्यात ६० पूर्णांक ६२ टक्के, हिंगोली – ६१ पूर्णांक १८ टक्के, जालना – ६४ पूर्णांक १७ टक्के, लातूर – ६१ पूर्णांक ४३ टक्के, नांदेड ५५ पूर्णांक ८८ टक्के, धाराशिव – ५८ पूर्णांक ५९ टक्के, तर परभणी जिल्ह्यात ६२ पूर्णांक ७३ टक्के मतदान झालं.

नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीसाठी ५३ पूर्णांक ७८ टक्के मतदान झालं.

गडचिरोली जिल्ह्यात दुपारी ३ वाजता मतदानाची वेळ संपली. तीन वाजेपर्यंत गडचिरोली जिल्ह्यात सरासरी ६९ पूर्णांक ६३ टक्के मतदान झालं.

****

बीड जिल्ह्याच्या अंबाजोगाई तालुक्यातल्या घाटनांदूर, चोथेवाडी, मुरंबी आणि जवळगाव आदी गावांमध्ये जमावानं लाठ्याकाठ्या आणि दगड घेऊन मतदान केंद्रांवर हल्ला केला. यावेळी व्हीव्हीपॅट मशीनसह मतदान यंत्रांची तोडफोड करण्यात आली. धनंजय मुंडे यांनी या घटनेचा तीव्र निषेध केला असून, निवडणूक आयोगानं या घटनेचं संपूर्ण फुटेज तपासून तात्काळ कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.

दरम्यान, या ठिकाणचं मतदान यंत्र बदलून मतदान प्रक्रिया सुरळीत झाल्याची तसंच सर्वांनी केलेलं मतदान सुरक्षित असल्याची माहिती बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी दिली –

> ***परळी मतदारसंघातील मौजे घाटनांदूर तालुका अंबाजोगाई येथील मतदान केंद्रावर काही अज्ञात व्यक्तिंनी मतदान यंत्राला क्षती पोहचवण्याचा प्रयत्न केला. ही मतदान यंत्रे बदलून नव्याने मतदानाची कार्यवाही सुरू झाली. यापूर्वी मतदान यंत्रामध्ये ज्यांनी मतदान केलं आहे, त्यांची सर्व मते सुरक्षित आहेत.***

****

परळी वैजनाथ इथल्या सरस्वती विद्यालयाच्या मतदान केंद्राचे केंद्राध्यक्ष जालिंदर जाधव यांना हृदयविकाराचा सौम्य झटका आला. रुग्णालयात झालेल्या प्राथमिक उपचारानंतर त्यांना घरी पाठवण्यात आल्याची माहिती निवडणूक विभागानं दिली आहे.

****

बीड विधानसभा मतदारसंघातील अपक्ष उमेदवार बाळासाहेब नारायण शिंदे यांचं हृदयविकाराच्या धक्क्यानं निधन झालं. आज दुपारी मतदान प्रक्रिया सुरू असतांना, मतदान केंद्राबाहेर शिंदे यांना हृदयविकाराचा धक्का बसला, त्यात त्यांचं तत्काळ निधन झाल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या कन्नड तालुक्यातल्या रामनगर गावातल्या ग्रामस्थांनी पायाभूत सुविधांच्या अभावामुळे मतदानावर बहिष्कार घातल्याचं वृत्त आहे.

****

धाराशीव जिल्ह्यातल्या परंडा शहरातल्या मतदान केंद्रावरच्या मतदान यंत्रात बिघाड झाल्यामुळे मतदान काही काळ बंद झालं होतं, मात्र यंत्रात दुरुस्ती केल्यावर मतदान प्रक्रिया सुरळीत झाली.

****

हिंगोली जिल्ह्यातल्या आखाडा बाळापूर इथल्या एका मतदान केंद्रात मोबाईलसह प्रवेश करून मतदान प्रक्रियेचं चित्रीकरण करून ते समाज माध्यमावर जाहीर करणाऱ्या एका तरुणाला पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. संतोष शिवाजी आमले, असं या तरुणाचं नाव असून त्याच्यावर बाळापूर पोलिस ठाण्यात आचारसंहिताभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला.

****

परभणी शहरातल्या शारदा महाविद्यालयाच्या मतदान केंद्रात शेख सुलेमान या व्यक्तीनं स्वत:चा मतदान करतानाचा फोटो समाजमाध्यमावर टाकल्यामुळे त्याच्याविरुद्ध गोपनीयतेचा भंग करण्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

****

निवडणुकीमध्ये पैसे उपलब्ध करून देण्यासाठी बिटकॉईन या क्रिप्टोकरन्सीचा अवैध वापर करण्यात काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या नेत्या सुप्रिया सुळे यांचा सहभाग असल्याचा आरोप भारतीय जनता पक्षानं आज पुन्हा एकदा केला आहे. भाजपचे प्रवक्ते संबित पात्रा यांनी आज नवी दिल्लीत पत्रकार परिषद घेऊन या प्रकरणाचा तपास व्हावा, अशी मागणी केली आहे. बिटकॉईनद्वारे सुमारे दोनशे पस्तीस कोटी रुपयांचा घोटाळा करण्यात आल्याचा आरोप पात्रा यांनी केला.

दुसरीकडे, माध्यमांना हाताशी धरून भाजपा आपल्यावर क्रिप्टो करन्सीच्या बाबतीत खोटे आरोप करत असल्याचं नाना पटोले यांनी म्हटलं आहे. अशा खोट्या बातम्या देणाऱ्यांच्या विरोधात कायदेशीर कारवाई करण्याचा इशाराही पटोले यांनी दिला आहे. दरम्यान, महाराष्ट्रातल्या बिटकॉईनच्या कथित देण्याघेण्याच्या या प्रकरणात आज सक्तवसुली संचालनालयानं छत्तीसगडमध्ये छापे घातल्याचं वृत्त आहे.

****

मतदारांचा उत्साह वाढवण्याच्या हेतूनं निवडणूक विभागानं राज्यभरात विविध ठिकाणी लक्षवेधक मतदान केंद्रं तयार करण्यात आली होती. त्यात महिला विशेष, युवक विशेष, दिव्यांग विशेष, हरित अशा विविध प्रकारची मतदान केंद्रांचा समावेश होता. सर्व मतदान केंद्रांवर मूलभूत सुविधांसह दिव्यांग, ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष सुविधाही उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

शंभरी पार केलेले अनेक मतदार, तसंच दिव्यांग मतदारांनीही प्रत्यक्ष मतदान केंद्रावर जाऊन उत्स्फुर्तपणे मतदान केलं. गडचिरोली तसंच हिंगोली जिल्ह्यातली महिला संचालित सखी मतदान केंद्रं, धुळे जिल्ह्यातलं आदर्श मतदान केंद्र, भंडाऱ्यातल्या बेला आणि रत्नागिरीच्या खेडशी इथली दिव्यांग मतदान केंद्रं, उत्तर नागपूरच्या पाचपावली इथं तृतीयपंथीयांसाठी उभारलेलं इंद्रधनुष्याच्या रंगांचं मतदान केंद्र आकर्षणाचं केंद्र ठरली.

छत्रपती संभाजीनगर इथंही महापालिकेअंतर्गत येणाऱ्या चार विधानसभा मतदार संघांमध्ये सर्व सोयींनी सुसज्ज अशी, चार आदर्श मतदान केंद्रं उभारण्यात आली होती.

****

राज्यभरात आज मतदारांमध्ये मतदानाचा उत्साह दिसून आला. मूळ अंबाजोगाई इथले रहिवासी असलेले आणि सध्या युरोपात नॉर्वे इथं कार्यरत असलेले गणेश कोदरकर यांनी नॉर्वेहून चोवीस तासांचा प्रवास करत मतदानाला हजेरी लावली. आपला अनुभव त्यांनी आकाशवाणीशी बोलतांना या शब्दांत व्यक्त केला –

***माझं नाव गणेश कोदरकर. आजच्या दिवशीच्या मतदानासाठी मी नार्वेवरून आलेलो आहे. नॉर्वे मध्ये मी काम करतो. आणि आजच्या दिवसासाठी खास अंबाजोगाईला माझ्या गावी येऊन मतदान केलंय. ही आवश्यक गोष्ट आहे. आणि प्रत्येकाने केली पाहिजे.***

****

लातूर जिल्ह्यात अहमदपूर इथं रितेश कासनाडे आणि आदित्य पांचाळ या नवमतदारांनी आज पहिल्यांदा मतदान केलं, मतदान केंद्रावर पुरवण्यात आलेल्या सुविधांबाबत त्यांनी समाधान व्यक्त केलं.

****

हिंगोली जिल्ह्यातल्या आखाडा बाळापूर इथे ९५ वर्षांच्या दृष्टीहीन आजी शशिकला पंडितराव राऊत यांनी मतदानकेंद्रावर प्रत्यक्ष येऊन मतदानाचा हक्क बजावला. १९६२ पासून आपण प्रत्येक निवडणुकीत मतदानाचं कर्तव्य पार पाडल्याचं या आजींनी सांगितलं.

नांदेड इथे १०५ वर्षांच्या शशिकलाबाई पोशट्टी टिप्रेसवार या आजींनी मतदान केंद्रावर प्रत्यक्ष येऊन सहकुटुंब मतदानाचा हक्क बजावला.

हिंगोली शहरात सकाळपासून मतदानाला उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. कळमनुरी विधानसभा मतदारसंघात मौजे हिवरा इथं विठ्ठल मुंडे या १०५ वर्षाच्या वृद्ध नागरीकाने मतदानाचा हक्क बजावला.

जालन्यात तृतीयपंथीयांनी जैन विद्यालयातल्या मतदान केंद्रावर मतदानाचा अधिकार बजावल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

जालना आणि परभणीसह अनेक ठिकाणच्या मतदान केंद्रांवर सायंकाळी साडे पाच वाजेनंतरही मतदारांच्या मतदानासाठी लांबचलांब रांगा लागल्याचं पहायला मिळत आहे.

****